I.O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** इस्लापूर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0043 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/04/2022 18:41 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
   **Date From (दिनांक पासून):** 23/04/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/04/2022
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Time From (वेळेपासून):** 15:30 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:40 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/04/2022 **Time (वेळ):** 18:07 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 025 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/04/2022 18:07 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पोस्टे ईस्लापुर,किनवट

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अमोल भानुदास मामीडवार

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारपोर्ट, युआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | ढाणकी ,उमरखेड,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | शिवणी,किनवट,इस्लापुर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8888611136

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शंकर डेडवाल | | | 1. पोस्टे इस्लापुर ,किनवट,इस्लापुर,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तकारदार/माहिती देणा-याकडून तकार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

पोलीस स्टेशन इस्लापुर दिनांक 26/04/2022फिर्याद मी अमोल भानुदास मामीडवार, वय 39 वर्षे, व्यवसाय व्यापार मेडीकल दुकान, रा. शिवणी ता.किनवट जि.नांदेड.ह.मु.ढाणकी ता.उमरखेड जि.यवतमाळ मो.क्र.8888611136 समक्ष पोलीस स्टेशन इस्लापुर, ता.किनवट जि. नांदेड येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणारा असुन माझे ढाणकी ता.उमरखेड जि.यवतमाळ येथे मेडीकल दुकान आहे. मी दिनांक 22/04/2022 रोजी पोलीस उप अधिक्षक, कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे यांचेकडे मला होणा-या लाचमागणी अनुषंगाने पुढील प्रमाणे तक्रार दिली होती. माझा भाऊ नामे अतुल भानुदास मामीडवार याचे शिवणी ता.किनवट जि. नांदेड येथे मेडीकलचा व्यवसाय आहे. माझा भाऊ अतुल हा त्याचे कुटूंबासह मौजे शिवणी ता.किनवट जि.नांदेड येथे वास्तव्यास आहे. त्याचे घरी किरायाणे राहत असलेले श्री.हनमंतु विश्वनाथ बेदरे यांचे विरुध्द पोलीस स्टेशन इस्लापुर, जि.नांदेड येथे गुटखा बाळगणे व विक्री संबधाने गुन्हा दाखल आहे. माझे भावाचे घरी राहणारे किरायदार श्री.हनमंतु बेदरे यांचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात माझा भाऊ अतुल मामीडवार यास आरोपी न करण्यासाठी पोलीस स्टेशन इस्लापुर, जि.नांदेड येथील सहायक पोलीस निरीक्षक शंकर डेडवाल साहेब यांनी मला दोन लाख रुपयांची मागणी केली आहे. सदर सपोनि यांना माझ्या नात्यातील भाऊ विशाल रेखावार यांना सोबत घेवुन दिनांक 23/04/2022 रोजी भेटण्यास जाणार आहे. वगैरे मजकुराची सविस्तर तक्रार दिली असुन तक्रारीवर माझीच सही आहे. 23/04/2022 रोजी सदर तक्रारीचे अनुषंगाने ला.प्र.वि.नांदेड येथील पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेवुन मौजे ढाणकी ता.उमरखेड जि. यवतमाळ येथे येवुन मला सापळा कार्यवाहीतील दोन्ही पंचाची व सापळा पथकातील सर्व सदस्याची ओळख करुन दिली. त्यानंतर मी पो.नि.श्री. एस.एल.नितनवरे यांचे सुचने प्रमाणे दोन्ही पंचाना माझी तोंडी तक्रार सांगीतली. त्यानंतर पंचानी माझी लेखी तक्रार वाचुन खात्री करुन दोन्ही पंचानी पण माझे तक्रारीवर सहया केल्या आहेत.त्यानंतर मला व दोन्ही पंचाना लाच मागणी पडताळणीचा उद्देश सांगुन, मला व सापळा पथकास तसेच दोन्ही पंचास लाचमागणी पडताळणी कार्यवाही संबधाने आवश्यक त्या सुचना दिल्या माझे स्वतःचे, पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे व दोन्ही पंचाचे परीचय दर्शक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे यांनी मला दिलेल्या सुचने प्रमाणे नात्यातील भाऊ विशाल रेखावार यास इस्लापुर येथुन सोबत घेवुन पंच क्र.1 श्री.गजानन ढोरे यांना सोबत घेवुन व्हाईस रेकॉर्डरसह शासकीय वाहना पासुन 15.30 वाजता रवाना होवुन पोलीस स्टेशन इस्लापुर, जि.नांदेड येथे जावुन सपोनि श्री.शंकर डेडवाल यांची भेट घेतली. त्यावेळी सपोनि श्री.शंकर डेडवाल यांनी पंच क्र.1 श्री.गजानन ढोरे यांचे समक्ष मला व नात्यातील भाऊ विशाल रेखावार यास माझा सख्खा भाऊ अतुल भानुदास मामीडवार यास गुन्हयात काढुन टाकु की, जामीन करुन घेता असे म्हणुन दोन लाख रुपयाची मागणी केली. तेव्हा मी त्यांना विनंती केली असता, त्यांनी मला एक असे म्हणुन एक लाख रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर परत मी त्यांना विनंती केली. त्यावर सपोनि श्री.शंकर डेडवाल सर मला म्हणाले, तुमची ईच्छा सांगा मला काय आहे. त्यावर मी त्यांना तीस हजार देतो सर असे म्हणालो. तेव्हा त्यांनी माझेकडे पन्नास

हजार रूपयांची मागणी केली. त्यानंतर मी थोडयावेळात पैसे घेवुन येतो असे म्हणुन सापळा पथकाचे वाहन थांबलेल्या ठिकाणी 16.40 वाजता परत आलो. तेव्हा पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे यांनी पंच क्र.1 श्री.गजानन ढोरे व माझेकडे लाचमागणी पडताळणी दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाची माहिती घेतली. तसेच लाचमागणी पडताळणी दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. सदर दिवशीच्या लाचमागणी पडताळणी दरम्यान सपोनि श्री.शंकर डेडवाल, पो.स्टे.इस्लापुर यांनी माझा भाऊ अतुल भानुदास मामीडवार यास गुटख्याच्या गुन्हयात आरोपी न करण्यासाठी पंच क्र.1 श्री.गजानन ढोरे यांचे समक्ष दोन लाख रूपयांची मागणी केली. तेव्हा मी त्यांना विनंती केली असता, त्यांनी मला एक असे म्हणुन एक लाख रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर परत मी त्यांना विनंती केली. त्यावर सपोनि श्री.शंकर डेडवाल सर मला म्हणाले, तुमची ईच्छा सांगा मला काय आहे. त्यावर मी त्यांना तीस हजार देतो सर असे म्हणालो. तेव्हा त्यांनी माझेकडे तडजोडी अंती पन्नास हजार रूपयांची मागणी करून स्वतःचा फायदा करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे यांनी माझे सोबत चर्चा करून माझे विनंती वरून दिनांक 24/04/2022 रोजी सपोनि श्री.शंकर डेडवाल यांचे विरूध्द सापळा कार्यवाही आयोजित करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दिनांक 24/04/2022 रोजी 12.45 वाजता पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे हे दोन्ही पंच व सापळा पथकासह मौजे ढाणकी येथे आले. त्यानंतर सापळा लावण्यापुर्वी पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे यांना मी विनंती केली की, सपोनि श्री.शंकर डेडवाल हे पो.स्टे.इस्लापुर, जि.नांदेड हे सध्या पोलीस स्टेशन ला हजर आहे किंवा नाही या बाबत माहिती घेवुन येतो. तेव्हा त्यांनी मला इस्लापुर येथे जावुन सपोनि श्री.शंकर डेडवाल हे पोलीस स्टेशनला हजर आहेत किंवा कसे या बाबत माहिती घेण्यास सांगीतले. त्यावरून मी इस्लापुर येथे येवुन सपोनि श्री.शंकर डेडवाल यांचे बाबत माहिती घेतली असता, मला समजले की, सपोनि श्री.शंकर डेडवाल यांची आज रविवार असल्याने त्यांची आठवडी सुटी आहे. त्यामुळे ते आज पोलीस स्टेशनला येणार नसल्याची खात्रीलायक माहिती समजली. त्यामुळे सदर दिवशीची कार्यवाही स्थगीत करण्यात आली. त्यानंतर दिनांक 25/04/2022 रोजी 13.10 वाजता पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे हे दोन्ही पंच व सापळा पथकासह मौजे ढाणकी येथे आले. त्यानंतर मी सापळा लावण्यापुर्वी सपोनि श्री.शंकर डेडवाल हे पोलीस स्टेशनला आहे किंवा कसे या बाबत माहिती घेतली. तेव्हा मला समजले की, सपोनि श्री.शंकर डेडवाल हे सकाळी हे 11.00 वाजता पावेतो पोलीस स्टेशनला हजर होते. त्यानंतर ते अचानक निघुन गेले आहेत. ते कुठे गेले आहेत. या बाबत कोणालाही माहिती नाही. त्यामुळे सर्व सापळा पथक सायंकाळ पर्यत सपोनि श्री.शंकर डेडवाल यांचा कॉल येईल व मला ते भेटण्यास बोलावतील म्हणुन वाट पाहिली परंतु त्यांनी सायंकाळी 7 वाजता पर्यत मला कॉल केला नाही व मला भेटण्यास बोलाले नाही. त्यामुळे पो.नि.श्री. एस.एल.नितनवरे यांनी मला सपोनि श्री.शंकर डेडवाल यांना कॉल करून बोलण्यास सांगीतले. त्याप्रमाणे सायंकाळी 7.12 वाजता कॉल केला असता त्यांनी माझा कॉल रिसीव्ह केला नाही. तसेच त्यांनतर सुमारे दिड तास त्यांचा कॉल येण्याची वाट पाहिली परंतु त्यांनी मला कॉल केला नसल्यामुळे सदर दिवशीची कार्यवाही स्थगीत करण्यात आली. त्यानंतर मी गावी परत गेल्या नंतर माझे गावात चर्चा होती की, कोणीतरी सपोनि श्री.शंकर डेडवाल साहेबाची अॅन्टी करप्शनला तक्रार केली. त्यामुळे पोलीस स्टेशन हुन निघुन गेले आहेत, अशी चर्चा माझ्या कानावर आली. त्यानंतर आज दि.26/04/2022 पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे हे सापळा पथकास मौजे ढणकी येथे आल्यानंतर मला समजलेली वरील प्रमाणेची माहिती सांगीतली. तेव्हा त्यांनी माझेकडे विचारणा केली की, आपल्या कार्यवाही बाबत त्यास कसे काय कळाले. तेव्हा मी त्यांना सांगीतले की, मी त्यांना दिनांक 23/04/2022 रोजी भेटण्यास गेलो. तेव्हा माझ्या हातात मोबाईल होता. त्यामुळे त्यांना मी मोबाईलवर काहीतरी रेकॉर्डर केल असावे असा त्यांना संशय आला असावा. त्यामुळे ते आता माझ्याकडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत. असे सांगीतले. तेव्हा त्यांनी मला दिनांक 23/04/2022 रोजीच्या कार्यवाही वरून पोलीस स्टेशन इस्लापुर, जि.नांदेड येथे समक्ष हजर होवुन फिर्याद देण्याची सुचना केली. तरी मी दिनांक 22/04/2022 रोजी ला.प्र.वि.नांदेड येथे पो.नि.श्री.एस.एल.नितनवरे यांचेकडे दिलेल्या तक्रारी प्रमाणे दिनांक 23/04/2022 रोजी 15.30 ते 16.40 वाजताच्या दरम्यान पोलीस स्टेशन इस्लापुर, जि.नांदेड येथे पंच क्र.1 श्री.गजानन ढोरे यांचे समक्ष करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी दरम्यान सपोनि श्री.शंकर डेडवाल, पो.स्टे.इस्लापुर यांनी माझा भाऊ अतुल भानुदास मामीडवार यास गुटख्याच्या गुन्हयात आरोपी न करण्यासाठी दोन लाख रूपयांची मागणी करून एक लाख तरी दयाला पाहिजे असे म्हणुन तडजोडी अंती पन्नास हजार स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन माझी सहायक पोलीस निरीक्षक श्री.शंकर डेडवाल, पोलीस स्टेशन इस्लापुर, जि.नांदेड यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये योग्य ती कायदेशिर होणे बाबत फिर्याद आहे.. हि फिर्याद दिली सही(अमोल भानूदास मामीडवार)रा.शिवणी ता.किनवट जि.नांदेड.मो.क्र.8888611136

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SHANKAR BHAGCHAND DEDWAL(SI (Sub-Inspector)) / 15151010004025BDM8702C **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन इस्लापुर ता.किनवट जि.नांदेड

पोलीस ठाणे अंमलदार

पो ठाणे इस्लापुर जि.नांदेड

**Signature of Officer-in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SHANKAR BHAGCHAND DEDW

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): 15151010004025BDM8702C